भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०२/२०१८

१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनाक २४/०२/२०१८ चे २२.४५ वाजता दरम्यान यातील अल्पवयीन फिर्यादी ही रात्र दरम्यान ट्रॅक्टरच्या बाजुला लघुशंका करून पॅन्ट घालीत असता, यातील आरोपीने फिर्यादीचे तोंड दाबुन गोठयात नेवुन तिच्या छातीला दाबुन तिचा पॅन्ट काढण्याचा प्रयत्न केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३५४(ब) भादवी. सहकलम ८ बाल लैगिक अत्याचार अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

२) लोखंडी सामानाची चोरी . :–

दिंनाक २५/०२/२०१८ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले स्टॉफ सह सनफ्लॅग कंपनी परिसरात पेट्रोलींग करीत असता यातील नमुद आरोपी क्र. १ ते ३ हे कंपनीचे कम्पाऊंडचे रोडचे बाजुला ऑटो क्र. एमएच ३६/३४८९ मध्ये वेस्टेज लोहा, लोखंडी तुकडी वजन अंदाजे ५०० ग्रॅम किंमती अंदाजे १०,०००/रु. चा वेस्टेज लोहा भरुन चोरुन नेतांनी मिळुन आल्याने फिर्यादी अजयकुमार बनारसिराम भारती वय ३१ वर्ष रा. आंबेडकर वार्ड वरठी सेक्युरीटी ऑफीसर सनफ्लॉग कंपनी वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खोकले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :–

दिंनाक २४/०२/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी शंकर श्यामराव राऊत वय ५० वर्ष रा. देशबंधुवार्ड भंडारा हा पोस्ट ऑफीस चौकातुन पायदळ जात असतांनी यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे अंगावर आणले असता, जखमी हे डांबरी रस्त्यावर खाली पडुन जखमी झाल्याने त्याचा मित्र नरेश गाटे यांनी औषधोपचाराकरीता सा. रु. भंडारा येथे भरती केले डॉक्टरी मेमो, एमएलसी रिपोर्ट व जखमीचे बयानावरुन सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. .

४) रेतीने भरलेल्या ट्रकची ईलेक्ट्रीक पोलला धडक लागुन ईलेक्ट्रीक वायर तोडुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–

दिंनाक २४/०२/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील रेतीने भरलेला ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जुनोना गावचे रोडला लागुन असलेल्या म.रा.वि.वि लघु दाब वाहीनीच्या ४ ईलेक्ट्रीक पोलला धडक मारुन ईलेक्ट्रीक वायर तोडुन ५०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी देवेन्द्र लोकचंद धकाते वय ३४ वर्ष, रा. खैरी दिवान (कनिष्ठ अभियंता म.रा.वि.वि) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

५) औषधोपचारा दरम्यान चिमुरडीचा मृत्यु . :–

दिंनाक २५/२/२०१८ चे १४.४० वाजता दरम्यान यातील रुग्न सु. बो. दवाखाना तुमसर येथे १) सौ. प्राची गौरीशंकर कावळे वय ३० वर्ष, २) कु. जिशा गौरीशंकर कावळे वय ०४ वर्ष, ३) कु. नव्या गौरीशंकर कावळे वय ०१ वर्ष ०६ महिने यांना गंभीर अवस्थेत औषधोपचाराकरीता आणले असता एम.ओ.सा. यांनी सदर रुग्नाची पाहणी केली असता कु. नव्या गौरीशंकर कावळे हिला मृत अवस्थेत दवाखाण्यात आनले असता मेमो दिल्याने व ईतर रुग्न क्र. ०१ व ०२ यांना सामान्य रुग्नालय भंडारा येथे रेफर केले व मृतकचे मरणाचे कारण निश्चीत सांगीतले नाही डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन तुमसर कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. म्हैसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. .

६) अवैध दारु / जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २५/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, करडी, सिहोरा, लाखनी, पालांदुर, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारु/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०९ लिटर हातभंट्टी दारू+ ११० किलो सडवा+ साहित्य किंमती १६,६१०/–रु. तसेच ५ लिटर ६७० मिली लिटर देशी दारु किंमती १८२४/–रु. तसेच जुगारातुन किंमती ४०२०/–रु. असा एकुण किमती २२,४५४/–रु. माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०२, तीन सिटर वाहनाकरीता ०६ ईतर वाहनांवरती – ६५ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.